ललिता गंडभीर
LALITATA GANDBHIR
4200 N.OCEAN DRIVE,1501-2
RIVIERA BEACH
FL 33404
USA.

# एका वस्तीची कथा

जॉन फुटपाथवरच्या बाकाच्या एका टोकाला झोपला तरी होता किंवा पिऊन तरी पडला होता. जगाशी सबंध तोडलेल्या माणसाच्या चेहऱ्यावर जे भाव असतात तेच त्याच्या चेहऱ्यावर होते. त्याने शब्दाने सांगण्याच्यापलीकडच्या रंगाचा ठिगळं लावलेला,गुढघ्यापर्यंत पोचणारा कोट घातला होता.खाली तसलीच पँट होती. वेगळया रंगाचे पायमोजे व मळकट शर्ट कोटाला शोभून दिसत होते. थंडीत, उन्हाळयात फॉल व स्प्रिंगमध्ये जॉनचे कपडे तेच.

शेजारी एक ब्राऊन पेपर बॅग होती. तीत जॉनची सगळी मालमत्ता होती, जवळच अर्धवट खाल्लेला हॅमबर्गर व अर्धी संपलेली बिअरची बाटली होती.

जॅक जॉनच्या दिशेने सडकेवरून झुलत झुलत आला. जॅकचे सोनेरी केस गुंतून त्याच्या खांद्यापर्यंत अस्ताव्यस्त पसरले होते. त्याने फक्त पॅच लावलेली जीन घातलेली होती. पायात व अंगात काहीच नव्हतं.

त्याचा अवतार कसाही असला तरी त्याच्या हिरव्या डोळयात तेज, मिस्किलपणा व भेदकपणा यांची मिसळ होती.

तो जॉनशेजारी जाऊन बसला व त्याने जॉनला हलवलं. "तू झोपला आहेस की प्यायला आहेस?" त्याने जॉनला विचारलं. जॉन तसाच पडून राहिला. जॅकलासुद्धा जॉन प्यालेला आहे की झोपला आहे हे कळत नव्हतं. "मी तुझा हॅमबर्गर खाऊ का?" त्याने जॉनला विचारलं आणि मग त्याचे केस धरून डोकं हो म्हणून हलवलं.

"थँक्स" म्हणून जॉनचा हॅमबर्गर खायला सुरवात केली.

मिसेस वॉर्नर चालत येत होती. ती बाकाजवळ येऊन थांबली.

पन्नाशीच्या आसपासची मिसेस वॉर्नर कायम टिपटॉप असायची. तिचे नाकडोळे तरतरीत होते. बोलण,वागणं सुसंस्कृत घराण्यातलं होतं. ती इंग्लिश वरच्या वर्गाच्या न्यू इंग्लंडच्या लोकांप्रमाणे बोलत असे.

जॅकला जॉनचा हॅमबर्गर खाताना बघून ती वैतागली व म्हणाली,"त्याचा हॅमबर्गर तू खातोस?"

"कुत्र्याने खाण्यापेक्षा मी खाल्लेला बरा." जॅकने हसत उत्तर दिले. "शिवाय माझ्यात आणि कुत्र्यात काय फरक?"

"ते बाकी खरं." मिसेस वॉर्नरने कबूल केलं.

"मिसेस वॉर्नर, तुम्ही काळजी करु नका. कुणीतरी त्याला सँडविच आणेल. ह्या रस्त्यावरची सर्व लोकं त्याची काळजी घेतात." जॅक म्हणाला.

"तो ह्या नेबरहुडचा एक महत्वाचा भाग आहे. तो दिसला नाही तर मी अस्वस्थ होते. बाकी सर्वांना पण त्याच्याशिवाय चैन पडत नसणार." मिसेस वॉर्नरने खुलासा केला.

"मी नाही का एक भाग?" जॅकने विचारलं.

"आणि काही वर्षांनी होशील कदाचित." मिसेस वॉर्नरने सांगितलं.

"मग हल्ली तू कुठे राहतोस?"

"मेपल रोडवरच्या अर्धवट पडलेल्या बिल्डिंगमध्ये." जॅक.

"तिथे पाणी आहे का?" मिसेस वॉर्नर.

"मला पाण्याची जरुरी फक्त पिण्यासाठी. ते मला पार्कमध्ये मिळतं." जॅक.

"हो! मी बघितलंय तुला पार्कमध्ये पाणी पिताना आणि हात धुताना" मिसेस वॉर्नर मिस्कीलपणे म्हणाली.

"वा! मी तोंड पण धुतो." जॅक.

"छान! तुझी प्रगती होते आहे. तुझी मैत्रीण कुठे आहे हल्ली?" मिसेस वॉर्नर.

"कुठली मैत्रीण?" जॅक.

"मला तिचं नाव ठाऊक नाही. तुझ्या सगळ्या मैत्रिणी सारख्याच दिसतात मला." मिसेस वॉर्नर

"सगळ्या त्या सारख्याच आहेत. शेवटची गेली फ्लॉरिडाला एका माणसाबरोबर."

"तिला मधून मधून खऱ्या बाथरूमची जरुरी भासत असेलं." मिसेस वॉर्नरने त्याला सांगितलं.

एवढ्यात एक जोडपं त्या बाकाजवळ येऊन पोचलं. मिस्टर पेरी पंचावन्न वर्षांचा गोलमटोल टक्कल पडलेला गृहस्थ होता. त्याच्या चालण्याबोलण्यात आत्मविश्वास निथळत असे. त्याला जगाचे सर्व प्रश्न कसे सोडवायचे हे बरोबर ठाऊक होतं. जर कोणी विरोध केला तर तो एकदम गरम व्हायचा. म्हणून जॅकला त्याला चिडवायला फार आवडत असे. काम न करता पैसे मिळवायचे हे मि.पेरीचं ध्येय होतं. त्याकरता तो खूप परिश्रम करीत असे. तेवढे परिश्रम त्याने एखादा धंदा करण्यात केले असते तर तो श्रीमंतही झाला असता. त्याच्या बोलण्यात शिव्या पेरलेल्या असत.

त्याची बायको पण इतकी जाड होती की तिच्या मापाचे तयार कपडे मिळत नसत. तिच्या चेहऱ्यावर 'हसते आहे' असा भाव असायचा. पण ती खरी हसत नसल्याचं शेवटी लक्षात यायचं. मि. पेरीच्या फालतू विनोदांना हसण्याचे हावभाव करून तिचा चेहरा तसा झाला असावा.

मिसेस वॉर्नरला पाहताच दोघं 'गुड मॉर्निंग'म्हणत तिच्याकडे वळली. जॅक बाकावरून 'गुड मॉर्निंग' म्हणून ओरडला,पण त्याच्याकडे कुणी लक्ष दिलं नाही.

मि.पेरी वॉर्नरला सांगू लागला,"आज सकाळी आपल्या रस्त्यावर ते कुत्रे आले होते. पहिले का? आपल्या वुडलंडमधल्या रस्त्यांपैकी आपला रस्ता तेवढा भाडेकरू असलेला उरला आहे. आता सगळे कुत्रे (रिअल इस्टेट एजंट्स) आपल्या मागे लागले आहेत."

जॅक मागून बोलला,"मि.पेरी तुमच्या बिल्डिंगचा पहिला नंबर,कांडो होण्यात."

मि.पेरी रागाने वळून म्हणाला,"गप्प बस! तुझ्यासारख्या माणसांना पाहून सर्वांना वाटतं हा भाग स्लम आहे. तू इकडून चालता का होत नाहीस?"

"मी गेलो तर तुमच्या मुलाला पण गेलं पाहिजे." जॅक.

"तुझ्या संगतीने तो बिघडला आहे." मिसेस पेरी म्हणाली.

"माझी आई म्हणते,की त्याच्या संगतीने मी बिघडलो आहे." जॅकने उत्तर दिलं.

"मग तू सरळ का होत नाहीस?" मि.वॉर्नरने मध्येच विचारलं. "काल तुझी आई आली होती. ती म्हणत होती की तुमचं फेअरलेन्समध्ये घर आहे. ती तुला घरी न्यायला आली होती."

"मला ह्या डार्कलेन्स जास्त आवडतात. ते लॉन,व्हॅकयुम क्लीनर,एअर कंडिशनिंग,कारपेट्स ह्या साऱ्या गोष्टींचा तिटकारा आला आहे."

प्रथमच उभं रहात जॅकने विचारलं,"माझ्या आईला सांगितलं नाही ना तुम्ही मी इथं राहतो आहे हे? तिला कळलं तर ती माझ्या मागे लागेल आणि मला ही जागा सोडून जावं लागेल."

"ठाऊक आहे मला तू घरी का जात नाहीस. तिथे तुला फक्त हात आणि तोंड धुऊन चालणार नाही." मिसेस वॉर्नरने जॅकला टोमणा मारला.

जॉन जागा झाला. बाकावर हात फिरवून हॅमबर्गर शोधू लागला. जॅकला थोडं वाईट वाटलेलं दिसलं व "सॉरी,मी तुझा हॅमबर्गर खाल्ला."तो जॉनला म्हणाला. जॉन खुड्बुडतच राहिला. जॅकने बिअरची बाटली त्याच्या हातात दिली.

मिसेस पेरी रागावली."तू खरा नालायक माणूस आहेस." ती जॅकला म्हणाली,"जॉनची सँडविचेस खातोस"तिने आपल्या पर्समधून एक सँडविच काढून जॉनला दिलं. जॉन हळूहळू त्याच्यावरचा पेपर सोडवू लागला.

"मिसेस पेरी,ह्या रस्त्यावर तो कधीच उपाशी राहणार नाही. तुम्ही सगळे त्याला जिवंत ठेवताय,खायला देऊन,जरूर पडली तर हॉस्पिटलात नेऊन." जॅकने मिसेस पेरीला सांगितलं.

"लंगडी आली पहा." मि.पेरी रस्त्याच्या टोकाकडे पाहत म्हणाला. तिथून जेमी येत होती. जेमी पेरीच्याच अपार्टमेंट बिल्डिंगमध्ये तळमजल्याला राहत असे.

पंचवीस वर्षांच्या जेमीचे केस कुरळे तपकिरी होते. डोळे त्याच रंगाचे होते. नाक छोटंसं अपरं होतं. ती हसली की तिच्या गालाला खळी पडत असे. जेमीचा एक पाय लहानपणी अपघातात दुखावला होता. त्यामुळे ती चालताना थोडी लंगडत चालत असे. कारचा ड्रायवर श्रीमंत होता. त्याने जेमीसाठी एका ट्रस्टमध्ये पैसे ठेवले होते. त्यातून जेमीला दर महिन्याला पैसे मिळत. त्यात ती घरभाडं व वरखर्च भागवायची. मधून मधून लहानसहान नोकऱ्या करायची. इतर वेळी पेंटिंग करत रस्त्यावर बागेत बसलेली असायची.

"आज इकडे एजंट्स फिरत होते." ती सर्व टोळक्याला उद्देशून म्हणाली.

"तुझ्या दुखावलेल्या पायाने तुझं नशीब उघडणार आहे." मिसेस पेरी म्हणली.

"ते कसं?" जेमीने विचारलं.

"आपली बिल्डींग कांडोसाठी विकली गेली की तुला तुझ्या डिसॅबिलिटीमुळे कोणी बाहेर काढू शकणार नाही" मिसेस पेरीने जेमीला माहिती दिली.

कायद्याप्रमाणे व्यंगी माणसांना तीन वर्षांची नोटीस द्यावी लागत असे. मिसेस पेरीला ते ठाऊक होतं. "पण बिल्डींग पाडायला सुरवात होईल. बाकी सगळे भाडेकरू जातील. अशा जागी मी एकटी कशी राहू?" जेमी.

"राहू नकोस. फक्त राहीन अशी भीती दाखव. त्यांच्याकडून चांगले पैसे उकळल्याशिवाय जागा सोडू नकोस." मिसेस पेरीने उपदेश चालूच ठेवला.

"बरोबर आहे. घरमालक आणि बांधणारे आपला फायदा करून घेतात. आपण का सोडायचं?" मि. पेरी म्हणाला.

"आपली बिल्डींग विकली जाऊ दे तर खरी,मी मालकाला असा धडा शिकवतो. सगळे बिल्डींग कोड्स वाचून ठेवले आहेत. आपल्या बिल्डिंगमध्ये बरीच दुरुस्ती केली पाहिजे. नव्या मालकाच्या मागे मी सरळ इन्स्पेक्टर्स लावणार आहे!"

"मग मि.पेरी तुम्ही आताच का आपल्या मालकाच्या मागे इन्स्पेक्टर्स लावत नाही?" जेमीने विचारलं.

"कारण तो मि.पेरीला गप्प बसायला पैसे चारतो." जॅकने बसल्या जागीच खुलासा केला." मि.पेरी तुमचे सगळे गनिमी कावे मला ठाऊक आहेत."

मि.पेरी भडकला. तो रागाने आणखी काही सांगेल या भीतीने मिसेस पेरीने चक्क त्याच्या तोंडावर हात ठेवला आणि ती दोघं कपडे उचलून लाँड्रॉमॅटच्या दिशेनं तावातावाने चालती झाली. मि.पेरीने जाता जाता मुठी दाखवून जॅकला सणसणीत शिव्या दिल्या.

"जॅकला तू वाटेल ते सांगतोस. तो कसा आहे तुला ठाऊक आहे. चार डॉलरसाठी आपली सगळी माहिती तो कोणालाही सांगेल. तुझे घरमालकाला त्रास द्यायचे बेत सांगेल." मिसेस पेरीने मिस्टर पेरीला दम भरला.

मि.पेरीला ते पटत होतं. पण राग आला की त्याला भान राहत नसे व बढाया मारायची तर त्याला वाईट सवय होतीच.

"हा भाग पूर्वी खूप प्रेस्टिजस होता. पण रेंट कंट्रोलनंतर सगळचं बिघडलं. आता पुन्हा तो प्रेस्टिजस होण्याच्या मार्गावर आहे." मिसेस वॉर्नर जेमीला सांगू लागली.

“म्हणजे सध्याची इथली माणसं इथून सोडून जाणार!” जेमी.

“त्यांना सोडून जावं लागणार. श्रीमंत लोक इथे राहायला येणार.” मिसेस वॉर्नर.

“ह्या बिल्डिंग्ज अगदी पडायला आल्या आहेत. त्या नीट करायची आवशकता आहे. त्या नीट बांधायला पैसे फक्त कांडो बनवूनच मिळतील. अजून तीन-चार वर्षांनी त्यात कुणाला राहाता येणार नाही. थोडक्यात इकडे आड तिकडे विहीर” जेमी म्हणाली,“पण तुम्हाला काय काळजी? तुमचं घर तर स्वतःचं आहे मिसेस वॉर्नर!”

“जेमी,इथली सध्याची माणसं अप्पर क्लास नसतील. पण माझे त्यांच्याशी लागेबांधे आहेत. मी त्यांना वीस वर्ष ओळखते. माझ्या वयात पैशाचं महत्व कमी वाटू लागतं. नव्या माणसांशी माझी ओळख व्हायला कित्येक वर्ष लागतील.” मिसेस वॉर्नर.

“या माणसांनी इथेच राहून बिल्डिंग्ज नीट करायला काही मार्ग नाही का?”

“आहे ना” जॅकने तोंड घातलं,“सर्वांनी माझ्यासारखंच राहायचं!”

“तुझ्यासारखं राहिलं तर इकॉनॉमीचं काय होईल?” जेमी.

“माझ्यासारखं राहणाऱ्याला इकॉनॉमीची काय काळजी? गरजा कमी करून टाकायच्या की सगळे प्रश्न सुटतात.”

“तुझ्यासारख्या राहण्यापेक्षा मी दुसरीकडे राहायला जाईन.” असं पुटपुटत जेमी मिसेस वॉर्नरबरोबर निघून गेली.

“जॉन तुझं सँडविच आलं आहे. थोड खाऊ का मी?” जॅकने जॉनला विचारलं. जॉन पुन्हा दुसऱ्या जगात पोचला होता. त्याने उत्तर दिलं नाही. जॅकने त्याला पुन्हा तोच प्रश्न विचारला. उत्तरादाखल ‘हो’ म्हणून त्यानं डोकं हलवलं आणि त्याचं सँडविच खात तो बसून राहिला.

पूर्वप्रसिद्धी :
कुंपणापलिकडचे शेत, श्रीविद्या प्रकाशन.
पक्षी जाय देशांतरा, उत्कर्ष प्रकाशन.